[illegible]

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण- ०५/२०१०/ प्र.क्र. ११२/अ-२

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक- २६ ऑक्टोबर, २०१०**

**प्रस्तावना-**

राज्यामध्ये सार्वजनिक उद्दिष्टांसाठी शेतक-यांच्या खाजगी जमिनी काही प्रसंगी दुष्काळग्रस्त परिस्थितीत लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी किंवा जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण रस्ते तयार करण्यासाठी व इतर निकडीच्या परिस्थितीत प्रसंगी शासनास संबंधित शेतक-यांच्या जमिनी ताब्यात घेणे भाग पडते. काही वेळा जमिनी दुष्काळग्रस्त परिस्थितीत रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने व दोन गावातील रस्ते तयार करण्याच्या उद्देशाने संबंधित शेतकरी त्यांच्या जमिनी सदर कामासाठी आपणहून / स्वखुशीने देत असतात. परंतु ब-याच कालावधीनंतर अशा जमिनीच्या नुकसान भरपाईची मागणी शासनाकडे किंवा मा. न्यायालयात दाखल करतांत.

सन १९७१-७२ या वर्षात तसेच त्यानंतरच्या काळात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असता, शासनाने रोजगार पुरविण्याच्या दृष्टीकोनातून रोजगार हमी योजनेची कामे सुरु केलेली होती. अशी कामे सुरु करतांना काही शेतक-यांनी आपल्या जमिनी रोजगार हमी योजनेच्या कामासाठी, पोच रस्ते तयार करण्यासाठी व इत्यादिसाठी शासनास स्वत:हून दिल्या होत्या किंवा शासनाने काही कालावधीसाठी ताब्यात घेतल्या होत्या. अशावेळी जमिनी ताब्यात घेतांना संबंधित शेतक-यांनी नुकसान भरपाईची मागणी केलेली नव्हती. परंतु कालांतराने ब-याच शेतक-यांनी रोजगार हमी योजनेच्या कामासाठी घेतलेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईची मागणी करुन मा. न्यायालयात दावे दाखल केले होते.

84929
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:- RB
आवक नं.
1 15 NOV 2010
कार्य विवरण नं.:- रोटी/एच-२५८९[ ५००-१०-२०१०]-१
प्र. शि. नि. उ. शि. जिल्हाधिकारी
19 NOV 2010

अशाच प्रकारच्या एका प्रकरणी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. १०७२३/१९९३ दाखल केले असतां मा. उच्च न्यायालयाने अर्जदाराच्या बाजूने निर्णय दिला असतां, या निर्णयाचा फायदा घेऊन अशाच प्रकारच्या जमिनीची नुकसान भरपाई मिळणेबाबतची जवळ जवळ १९१ प्रकरणे मा. उच्च न्यायालयात दाखल केली होती. रिट पिटीशन क्रमांक १०७२३/१९९३ या न्यायालयीन प्रकरणांत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्याविरुद्ध राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात अपील क्रमांक ६०६६/१९९५ अपील दाखल केले होते. सदर अपीलावर निर्णय देतांना मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १२/५/१९९५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या बाजूने निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रस्तुत अपिलावर निर्णय देतांना काही निष्कर्ष नोंदविले आहेत कि, " २० वर्षापूर्वी ताब्यात घेतलेल्या जमिनीचा मोबदला २० वर्षाच्या विलंबाने मागणी करण्याचा हक्क जमीनदारास राहत नाही. २० वर्षाच्या विलंबाने नुकसान भरपाईची मागणी करणे म्हणजेच शासनाने अशी जमीन ताब्यात घेतलीच नाही असे समजावे लागेल. जर जमीन ताब्यात घेतली असेल तर ती जमीन मालकाच्या संम्मतीशिवाय घेतली नसावी आणि जरी जमीनधारकाची संम्मती नसेल तरीही त्याने नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क सोडून दिलेला आहे असे समजावे लागेल.

अशा प्रकारच्या टंचाई निवारण कार्यक्रमासाठी शासनाने प्रदीर्घ कालावधीपूर्वी तात्पुरत्या ताब्यात घेतलेल्या किंवा जमीनधारकांनी स्वत:हून दिलेल्या जमिनीबाबत नुकसान भरपाईची मागणी करण्यासंदर्भातील प्रकरणात बरीच वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. राज्यात दुष्काळग्रस्त परिस्थितीत रोजगार पुरविण्याच्या उद्देशाने अशा जमिनी शासनाने यापूर्वी शेतक-यांच्या संम्मतीने किंवा शेतक-यांशी वाटाघाटीद्वारे घेतल्या असाव्यात व त्यामुळे त्या दरम्यानच्या कालावधीत शेतक-यांनी कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईची मागणी केलेली नव्हती. परंतु प्रदीर्घ कालावधीनंतर अशाप्रकारे इतक्या विलंबाने नुकसान भरपाईची मागणी करणे संयुक्तीक नसल्याचे उपरोक्त निष्कर्ष मा. न्यायालयाने नोंदविले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक १२ मे, १९९५ चा निर्णय व त्यातील निष्कर्ष लक्षात घेऊन त्या अनुषंगाने सुस्पष्ट निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन सर्व बाबींवर सर्वंकष विचार करुन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे-:

**शासन निर्णय-**

शासनाने सार्वजनिक प्रयोजनांतर्गत एखादी योजना तातडीने राबविण्यासाठी खाजगी जमीन, जमीन मालकांकडून ताब्यात घेण्याची नितांत निकड असते. अशावेळी खाजगी जमीन ताब्यात घेतांना काही अटीवर प्रस्तुत जमीन जमीन मालकाकडून घेण्यात येते. ज्या अटीवर जमीन मालकाकडून जमीन घेण्यात आली असेल त्या अटीनुसारच जमीन मालकास नुकसान भरपाई देय राहील. मात्र, जमीन मालकांकडून जमीन ताब्यात घेतांना कोणत्याही अटी घालण्यांत आल्या नसतील तर किंवा जमीन विनामूल्य ताब्यात घेतली असेल तर अशा जमिनीबाबत जमीन मालकास नुकसान भरपाई देय राहणार नाही. परंतु एखादी जमीन भूसंपादन अधिनियम, १८९४ नुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केली असल्यास अशा जमिनीसाठी नुकसान भरपाई देय राहील.

शासनाने सार्वजनिक प्रयोजनासाठी शेतक-यांच्या खाजगी जमिनी, जमीन मालकांच्या संम्मतीने, राजीनामा, बक्षीसपत्रक, दानपत्र किंवा तत्सम् प्रक्रियेद्वारे स्वखुशीने शासनाच्या ताब्यात दिल्यास अशा जमिनीची नुकसान भरपाई काही कालावधीनंतर मागणी करण्याचा अधिकार संबंधित जमीन मालकास रहात नाही व अशाप्रकारे ताब्यात घेतलेल्या जमिनीसाठी जमीन मालकांनी कालांतराने नुकसान भरपाईची मागणी केल्यास त्यांनी नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क सोडून दिलेला आहे असे गृहीत धरण्यास वाव असल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्रमांक- ६०६६/१९९५, महाराष्ट्र शासन विरुद्ध दिगंबर या न्यायालयीन प्रकरणामध्ये दिनांक १२/५/१९९५ रोजी दिलेल्या न्याय निर्णयामध्ये स्पष्ट निष्कर्ष नोंदविलेले आहेत. जर भविष्यात अशाच प्रकारची काही प्रकरणे उद्‌भवल्यास अशा प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयानुसार विचार करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. जमीन ताब्यात घेते वेळी मोबदला संदर्भात अटी लागू केल्या नसल्यास किंवा रीतसर भूसंपादन प्रक्रियेच्या माध्यमातून संपादन झाले नसल्यास, जमीन मालकाच्या संम्मतीशिवाय घेतली नसावी व त्याने नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क सोडून दिला आहे असे समजून कालांतराने संबंधित जमीन मालकांनी नुकसान भरपाईची मागणी

केल्यास अशी नुकसान भरपाई संबंधितांना देण्यांत येऊ नये व अशी प्रकरणे नाकारण्यांत यावीत.

सदरहू शासन निर्णय मंत्रालयीन विभाग तसेच विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयाच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही करावी. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१०१०२६१८४०२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सीताराम कुंटे)
प्रधान सचिव
महसूल व वन विभाग

प्रत-

मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव, महसूल वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी/ अतिरिक्त जिल्हाधिकारी
सर्व उपविभागीय आधिकारी/भूसंपादन/विशेष भूसंपादन अधिकारी
सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ ( लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ ( लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई, नागपूर
वेब कोऑर्डीनेटर, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, अ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

क्र. महसूल/२/भूसं/कावि- [illegible]
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दि- ३०/११/२०१०

---------

प्रति,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रत्नागिरी
उपविभागीय अधिकारी दापोली, चिपळूण, रत्नागिरी
२/- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

1/12/10

01.12.10

एच-२५८९ -२३।-